**MHBI120003782017**

## <u>नियमीत दिवाणी दावा क्र. ७८/२०१७ मधील नि.क्र. ८५ खालील आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ यांनी त्याची लेखी कैफियत अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. उपरोक्त प्रतिवादी यांनी असे नमुद केले आहे की, सदरचा दावा माजलगाव येथील न्यायालयाने खारीज केला होता व त्यानंतर वरिष्ठ न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार पुन्हा अभिलेखावर घेण्यात आलेला आहे. परंतु सदर दावा धारुर न्यायालयात आल्यावर प्रस्तुत प्रतिवादींनी त्यांची पूर्वी दिलेली कैफियत अभिलेखावर घेण्यासाठी अर्ज न केल्याने सदर कामी प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर आलेली नाही. त्यामुळे त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्याची विनंती केली आहे.

३. अर्जास वादी यांनी म्हणणे दाखल करुन अर्ज देण्यास विलंब झाल्याने सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुत वादी व प्रतिवादी यांच्या दरम्यान सदरचा दावा माजलगाव न्यायालयात दाखल होता. परंतु सदरचा दावा दिनांक १०.०१.२०१२ रोजी खारीज करण्यात आला. त्यानंतर सदरचा दावा किरकोळ दिवाणी अर्ज क्र. २१/२०१२ मधील आदेशाप्रमाणे पुन्हा न्यायपटलावर घेण्यात आला आहे. त्यानंतर सदरचा दावा मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बीड यांच्या दिनांक २१.०३.२०१७ रोजीच्या आदेशाने धारुर न्यायालयात पाठवण्यात आला. अभिलेख वाचून पाहिला असता असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांची कैफियत पूर्वीच्या दाव्यात निशाणी क्र. १२ येथे दाखल केलेली

आहे. परंतु सदरची कैफियत प्रतिवादी यांनी सदर दावा सुरु झाल्यावर मान्य केल्याची पुरशीस न दिल्याने सदरचा दावा त्यांच्या कैफियतीविना पुढे सुरु होता. प्रतिवादी यांनी दिलेले कारण योग्य वाटत असल्याने सदरचा अर्ज मंजूर करणे योग्य होईल. तसेच नैसर्गिक न्यायाच्या तत्वाच्या दृष्टीने प्रतिवादी क्र. १ यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे गरजेचे आहे. प्रतिवादी क्र. १ यांची कैफियत अभिलेखावर न घेतल्यास त्यांचे अपरिमीत नुकसान होण्याची शक्यता आहे. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादीक्र. १ यांनी विशेष दिवाणी दावा क्र. २२/२००९ मध्ये निशाणी क्र. १२ येथे दाखल केलेली कैफियत या कामी त्यांच्या वतीने कैफियत म्हणून अभिलेखावर घेण्यात यावी.

NILESH MALAKAPPA WALI

Digitally signed by NILESH MALAKAPPA WALI
Date: 2024.09.09 10:04:56 +0300

स्थळ-धारुर (एन.एम.वाली )

दिनांक ०६.०९.२०२४ दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

धारुर

**प्रमाणपत्र**

मी अभिकथन करतो की, या पी.डी.एफ. वरुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयातील शब्द-नि-शब्द हे मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| **लघुलेखक ग्रेड-३** | **ए.एस.गंगणे** |
| न्यायालयाचे नाव | दिवाणी न्यायालय<br>क. स्तर, धारुर |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०६.०९.२०२४ |
| न्यायनिर्णयावर पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | ०६.०९.२०२४ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | ०६.०९२०२४ |

सही/-
(ए.एस.गंगणे )
लघुलेखक ग्रेड-३
दिवाणी न्यायालय क. स्तर, धारुर